उत्कर्ष
UTKARSH

# 26 वा
# वार्षिक अहवाल
## 2023-24



**8687 100 100** | **उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्था मर्या., वाई** | **utkarshlimited.com**

सहकारातून उत्कर्ष

# उत्कर्ष UTKARSH



आमचे प्रेरणास्थान संस्थापक : **कै. आनंद कोल्हापुरे**

उत्कर्षची शान, उत्कर्षचा अभिमान,
आदर्श चेअरमन, वाई भूषण, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त



**श्रीमती अनुराधा आनंद कोल्हापुरे**
अध्यक्षा



**ॲड.श्री. रमेश रामचंद्र यादव**
उपाध्यक्ष



श्री. अमर आनंद कोल्हापुरे



श्री. मदन कृष्णाजी साळवेकर



डॉ. मंगला प्रकाश अहिवळे



श्री. श्रीकांत सुनिल शिंदे



श्री. शरद रामचंद्र चव्हाण



श्री. सलीमभाई सोनुभाई बागवान



श्री. संजय लक्ष्मण वाईकर



श्री. सागर विलास मुळे



श्री. वैभव सुरेश फुले



श्री. भूषण सुधाकर तारू



श्रीमती नीला मधुकर कुलकर्णी



श्रीमती अलका मदन घाइगे

# उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वाई

नोंदणी क्र. : एस.ए.टी./वाई/आर.एस.आर.(सी.आर.) १२०१/१५/०३/१९९९

## २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

सर्व सभासदांना कळविणेत येते की, **संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० वा. कृष्णोत्सव मंगल कार्यालय, मधली आळी, वाई येथे** खालील विषयांचा विचार करणेकरीता आयोजित केली आहे. तरी सभासदांनी वेळेवर आवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**● सभेपुढील विषय :**

१. दि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि .३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे वाचन करणे व स्वीकृत करणे.
३. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा मा. वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल वाचन करणे व स्वीकृत करणे.
४. संस्थेस सन २०२३-२४ मध्ये झालेल्या नफ्याची कायदा व नियम यांस अनुसरून मा. संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणी करण्यास मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
५. सन २०२४-२०२५ करिता तयार केलेल्या अंदाजपत्रकाची व गतवर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे व जास्त झालेल्या खर्चास मान्यता घेणे.
६. मा.संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
७. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी शासन नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
८. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
९. सन २०२२-२०२३ लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
१०. मा. संचालक मंडळाने सुचविलेली उपविधीमधील पोटनियम दुरूस्तीस मंजुरी देणे.
११. सन २०२४-२०२५ करीता प्रशिक्षण, कर्ज, ठेव, गुंतवणूक व वसुली इ. तत्सम विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
१२. सामोपचार परतफेड योजने अंतर्गत कर्ज खात्यांमध्ये सवलत दिलेल्या व्याज रक्कमेची नोंद घेणे.
१३. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

Sd/-
मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**श्री.प्रकाश मारूती पवार**
मुख्य व्यवस्थापक

स्थळ : **वाई**
दिनांक : **१३.०९.२०२४**

### विशेष सूचना

१. सन २०२३-२०२४ चा अहवाल, ताळेबदं पत्रक व नफा तोटा पत्रक संस्थेच्या वेबसाईट www.utkarshlimited.com व सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.
२. गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासानंतर वरिल विषयांसाठी संस्थेच्या पोटनियम क्र. इ. ३५ (३) मधील तरतुदीनुसार घेतली जाईल व त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
३. ज्या सभासदांना वरील विषय पत्रिकेतील विषया संदर्भात अथवा ताळेबंद पत्रक व नफातोटा विषयक विधायक स्वरुपाची माहिती विचारावयाची असेल त्यांनी तसे लेखीपत्र दि.२०/०९/२०२४ रोजी सायं. ५ वा. पर्यंत मुख्य कार्यालयास अथवा संस्थेच्या ई-मेल आयडी utkarsh_wai@rediffmail.com वर विचारणा करावी. म्हणजे माहिती देणे शक्य होईल. ऐनवेळेस विचारलेली माहिती वा आकडेवारी देणे शक्य होईलच. असे नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.
४. शासनाच्या नियमाप्रमाणे आपली के.वाय.सी. पुर्तता असल्यासच आपल्या लाभांशाची रक्कम आपल्या सेव्हिंग्ज ठेव खाती वर्ग केली जाईल. तीन वर्षापर्यंत लाभांश न घेतल्यास नियमाप्रमाणे लाभांश रक्कम राखीव निधीत जमा होते याची नोंद घ्यावी. सबब आपले सेव्हिंग्ज ठेव खाते नसल्यास संबंधित शाखेत खाते उघडावे व के.वाय.सी. ची पूर्तता करावी.
५. शेअर्स सर्टिफिकेट तयार झालेली आहेत. कृपया कार्यालयीन वेळेत संबंधित शाखांमधून स्वत: येऊन घेऊन जावीत.
६. सभासदांनी आपली अहवालाची प्रत नजिकच्या शाखेतून घेऊन जावी.

**मुख्य कार्यालय पत्ता : ४४२, उत्कर्ष, गणपती आळी, वाई, ता.वाई, जि.सातारा. पिन ४१२८०३.**

# अध्यक्षीय मनोगत



सन्माननीय सभासद बंधू-भगिनी

सस्नेह नमस्कार,

आपल्या उत्कर्ष पतसंस्थेच्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मी श्रीमती अनुराधा कोल्हापुरे, अध्यक्षा या नात्याने आणि सर्व सचालक, अधिकारी व कर्मचारी यांचे वतीने आपणा सर्वांचे प्रेमपूर्वक मनापासून स्वागत करते. या निमित्ताने आपणा सर्वांशी हितगुज करण्याची आणि संस्थेच्या प्रगतीची घौडदौड आपणास अवगत करण्याची संधी प्राप्त होते आहे. याचा मला खूपच आनंद होतो आहे.

अहवाल सालात संस्थेवरील विश्वासामुळेच सभासद संख्या १५२७८ वरून २१२२६ इतक्या पर्यंत वाढली आहे. हे तुमचे प्रेमाचे द्योतक आहे. ठेवी आणि कर्जे यातही भरघोस वाढ झाली आहे. ३१ मार्च २०२३ रोजी असलेले ठेवी व कर्जे अनुक्रम रूपये १०३.६५ कोटी व रूपये ८२.५२ कोटी वरून ऑगस्ट २०२४ अखेर ११२.५५ कोटी व रू. ९५.२८ कोटीवर पोहोचलेली आहे. सी.डी. रेशो आणि भांडवल पर्याप्तता प्रमाण सुध्दा आदर्श प्रमाणात राखले आहेत. यावर्षी आर्थिक व्यवहारातून नक्त नफा १.५६ कोटी झाला असून शाखा विस्तारात तीन नव्या शाखांची म्हणजे पुणे, बारामती आणि कोल्हापुर अशी भर पडली आहे. आपणांस आनंद वाटेल की, आपले सातारा जिल्हा कार्यक्षेत्र ओलांडून आपण पुणे, कोल्हापुर या नव्या जिल्ह्यांमध्ये प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे या नव्या शाखा सुध्दा अत्यंत चांगला व्यवसाय करीत आहेत. याचबरोबर मात्र अनुत्पादीत कर्जात म्हणजेच ग्रॉस / नेट एन.पी.ए. मध्ये घट झाली असली तरी अजूनही हे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व प्रकारचे कायदेशीर प्रयत्न सुद्धा चालू आहेत. या अनुत्पादित कर्जांमुळे आपल्याला नफ्यातून नियमानुसार तरतूद करावी लागते आणि त्यामुळे नफा क्षमता कमी होते. मी सर्व सन्माननीय कर्जदारांना या प्रसंगी विनंती करते की, आपले कर्जाचे व व्याजाचे हप्ते वेळेवर भरून संस्थेस वसुली प्रयत्नांत मदत करावी. आपणासमोर अहवाल वर्षातील आर्थिक पत्रके व लेखाजोखा अत्यंत पारदर्शीपणे ठेवला आहेच. तसेच संस्थेच्या वेबसाईट वर पाहण्यास तो उपलब्ध आहे. त्यास आपण या सभेत स्वीकृती द्यावी, ही नम्र विनंती.

व्यावसायिकता आणि नफा क्षमता तसेच कार्यक्षेत्र वाढ आणि शाखा विस्तार यावर लक्ष केंद्रीत करत असतानाच संस्थेने सामाजिक बांधिलकेचेही भान ठेवले आहे. आपणा सर्वांना माहित आहेच की, वाई फेस्टिवल, चित्रकला स्पर्धा, १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिना निमित्त आयोजित देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम, गिर्यारोहण, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, रांगोळी स्पर्धा या सारख्या अनेक विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन संस्थेने यशस्वीरित्या केले. तुमच्या सक्रीय सहभागाशिवाय हे होऊ शकले नसते याची मला जाणीव आहे. संस्थेवरील तुमचा दृढ विश्वास आणि आपुलकी यामुळेच रौप्यमहोत्सवी वर्षानंतर आपला व्यवसाय वेगाने वाढतो आहे. संस्थेचे संस्थापक कै. आनंदराव कोल्हापुरे यांनी लावलेले इवलेसे रोपटे रौप्यमहोत्सव साजरा करून वटवृक्षात रूपांतरीत झाले आहे. याचे सर्व श्रेय तुम्हा सभासद, ग्राहक, हितचिंतक यांनी दाखविलेल्या आणि जपलेल्या जिव्हाळा व प्रेमामुळेच आहे याची जाण व्यक्तिशः मला आणि संचालक मंडळातील माझे सहकारी यांना आहे. त्यासाठी तुमचे आभार मानण्यास शब्द अपुरे आहेत.

या प्रगती पथावर घौडदौड करीत असताना ही प्रगती न पाहवणारे आणि संस्थेचे अहित चिंतनारे थोडेफार लोक असणाराच कारण दगड आंब्याच्या झाडाला मारतात, बाभळीच्या नाही याची जाण आम्हास आहे. परंतु असे थोडेफार अपवाद दुर्लक्षित केले तर बहुसंख्य सभासद, ग्राहकांचा आम्हास भक्कम पाठींबा आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो.

आम्ही आपणा सर्वांना अशी ग्वाही देतो की, आपण सर्वांनी आमचेवर टाकलेली जबाबदारी आम्ही पूर्ण ताकदीने, अत्यंत प्रामाणिकपणे व पारदर्शी व्यवहार ठेवून संस्थेचे हितकारक निर्णयच घेऊ. सर्व आर्थिक पत्रके पाहता आपल्या लक्ष्यात येईल की, सर्वच आदर्श गुणोत्तरे आणि नियामक मंडळ व सहकार खाते यांना अपेक्षित मानांकने आणि विवेकपूर्ण निकष याची पूर्तता संस्था करते आहे. पारदर्शी आणि प्रामाणिक सचोटीचा कारभार हेच सहकारी संस्थेचे यशाचे गमक आहे. ते आम्ही कसोटीने पाळतो आहोत. 'इदम् न मम' हे माझे नाही या विश्वस्त वृत्तीतून मी आणि माझे सहकारी संचालक कारभार करत आहोत. आपण दाखविलेल्या विश्वासास तडा जावू न देता संस्थेची प्रगती तुम्हा सर्वांचे सहाय्याने पुढील काळातही अशीच होत राहित,
अशी ग्वाही याप्रसंगी मी तुम्हास देवू इच्छिते, यापुढेही आपला पाठिंबा व प्रेम कायम रहावे हीच नम्र विनंती.

जय हिन्द! जय महाराष्ट्र ! जय सहकार!

धन्यवाद!

आपली
**श्रीमती अनुराधा आनंद कोल्हापुरे**
अध्यक्षा

**वार्षिक सर्वसाधारण सभा :**

संस्थेची मागील सर्वसाधारण सभा, शनिवार, दि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी दु.२.०० वाजता, कृष्णोत्सव मंगल कार्यालय, मधली आळी, वाई येथे संपन्न झाली होती. सर्व विषयांचे ठराव सर्वानुमते संमत होऊन योग्य अंमलबजावणी सुरू आहे.

**संचालक मंडळ सभा :**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण २५ सभा झाल्या व सभेत संचालकांची उपस्थिती १००% होती. या सभांमधून संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांनी कामकाजात जबाबदारीने सक्रिय सहभाग घेतला व सभांमधील ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले. संमत केलेल्या ठरावांची कार्यवाही झालेली आहे. संस्थेतील विविध विभागाचे कामकाज जलदगतीने व सुलभतेने व्हावे याकरीता संचालक मंडळाचे अंतर्गत असलेली कर्ज मंजुरी समिती, गुंतवणुक समिती, लेखापरिक्षण समिती, व खरेदी-विक्री समिती यांच्या वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या सभांनाही समिती सदस्यांनी समाधानकारक उपस्थिती दाखविली आहे. उत्तम नियोजन, अचूक निर्णय व एकसंघता यात सर्वांचाच हातभार आहे.

**संचालक मंडळ व नातेवाईकांकडील कर्जे :**

| तपशील | ३१.०३.२०२३ येणे | २०२३-२४ वाटप | २०२३-२४ जमा रक्कम | ३१.०३.२०२४ येणे | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| संचालक | ६०,६६,१७५/- | - | ५०,५१,६७९/- | १०,१४,४९६/- | नाही |
| नातेवाईक | ३१,९७,७२०/- | - | २,२०,६५४/- | २९,७७,०६६/- | नाही |
| **एकूण** | **९२,६३,८९५/-** | **-** | **५२,७२,३३३/-** | **३९,९१,५६२/-** | **नाही** |

**सभासद :**

३१ मार्च २०२४ अखेर एकूण सभासद संख्या २१,२२६ इतकी आहे. सभासद संख्येमध्ये चालू आर्थिक वर्षात ६१७२ ने वाढ झाली असून एकूण २२४ सभासदांनी आपल्या सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे. सभासद वाढीचे प्रमाण ४०.३९% आहे. कृपया ज्या सभासदांनी अद्याप आपली वारस नोंद केली नाही त्यांनी लवकरात लवकर वारस नोंद करावी.

**भागभांडवल व निधी :**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल मर्यादा रू. ८ कोटी असून दि. ३१/३/२०२३ अखेर वसूल भागभांडवल रू. ७ कोटी २८ लाख ६९ हजार ७०० होते. सन २०२३-२४ अखेर वसुल भागभांडवल रू. ७ कोटी ८० लाख ८४ हजार ९०० आहे. गतसालच्या तुलनेत भागभांडवलामध्ये ७.१५% ने वाढ झालेली आहे. निधी रक्कम सन २०२२-२३ मध्ये रू. २० कोटी ८ लाख ६९ हजार २०१ इतकी होती. चालू वर्षात १ कोटी ६४ लाख ७७ हजार ५४६ निधीची वाढ झाली आहे. त्याचे प्रमाण ८.२०% आहे. दि.३१/३/२०२४ अखेर एकूण निधी रक्कम २१ कोटी ७३ लाख ४६ हजार ७४७ इतकी आहे.

**गुंतवणूक :**

संस्थेचे आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी संस्थेने विविध राष्ट्रीयकृत, शेड्युल, मल्टीशेड्युल, सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत विविध मुदतीत वैधानिक गुंतवणूक रूपये २४ कोटी १६ लाख ८६ हजार ८५९/- व निधी गुंतवणूक १६ कोटी २४ लाख ५७ हजार ८२९ व शेअर्स मधील गुंतवणूक १७ लाख ७९ हजार १००/- केली असून एकूण गुंतवणूक रूपये ४० कोटी ४१ लाख ४४ हजार ६८८/- एवढी केली आहे. सदरची गुंतवणूक ही तरलतेपोटी असणाऱ्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केली आहे.

**ठेवी : संस्थेने १०५ कोटींचा टप्पा ओलांडला.**

संस्थेकडे असलेल्या ठेवी ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतिक असतात. ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास अधिकाधिक वृद्धींगत होत आहे. दि.३१/३/२०२३ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी १०३ कोटी ६५ लाख ३१ हजार ४८१ इतक्या होत्या. चालू अर्थिक वर्षामध्ये एकूण वाढ २ कोटी २६ लाख ३१ हजार ४७५ झालेली आहे. वाढीचे प्रमाण २.१८% आहे. दि.३१/३/२०२४ अखेर एकूण ठेवी १०५ कोटी ९१ लाख ६२ हजार ९५६ इतक्या आहेत.

**कर्जे :**

दि.३१ मार्च २०२३ अखेर एकूण कर्जवाटप रूपये ८२ कोटी ५२ लाख ३४ हजार ६५२ होते. अहवाल सालात कर्जवाटपात रूपये १३ कोटी ६६ लाख ६८ हजार ६३३ ने वाढ होऊन एकूण कर्जवाटप रूपये ९६ कोटी १९ लाख ०३ हजार २८५ झालेले आहे. कर्ज वाढीचे प्रमाण १६.५६ % आहे. कर्जवाटपात सध्या बँकिंग क्षेत्रामध्ये तीव्र स्पर्धा असूनही कर्ज वाढ झालेली आहे. एकूण कर्जामध्ये सोनेतारण कर्जाचे प्रमाण ३०.९४% आहे. उत्पादकता, आवश्यकता, परतफेड क्षमता इ. निकष लावूनच कर्जवाटप केलेले आहे. दि.३१/३/२०२४ अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण १४.३०% इतके आहे. **भविष्याचा वेध घेऊन ज्यादा एन.पी.ए. तरतूदीपोटी एकूण ४ कोटी ९४ लाख ४१ हजार ६१२ एवढ्या रकमेची तरतूद केली असून सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब मोलाची आहे.**

**नफा :**

संस्थेने स्वत:च्या निधींचा व ठेवीद्वारे उपलब्ध होणाऱ्या रक्कमेचा काटेकोरपणे वापर करून अधिकाधिक सभासदांना पतपुरवठा करून समाधानकारक नफा कमविलेला आहे. कमी कर्मचारी, कमी खर्च व अधिक उत्पादकता इ. मुळे संस्थेत अहवाल सालाअखेरीस व्याज व इतर बाबींतून रूपये १५ कोटी ६२ लाख ३८ हजार ८९७ इतके उत्पन्न मिळाले असून त्यातून दिलेले व्याज, व्यवस्थापन खर्च, फंड, तरतूदी, अनुत्पादित कर्जासाठी तरतूद असे एकूण रूपये १४ कोटी ०६ लाख २९ हजार २१८ वजा जाता निव्वळ नफा रूपये १ कोटी ५६ लाख ९ हजार ६७९ इतका झाला आहे.

**नफा विनियोग :**

आवश्यक त्या तरतूदी करून निव्वळ नफा रू. १,५६,०९,६७९.१० इतका झाला आहे. संस्थेने यावेळी सर्व सभासदांना १०% लाभांश देण्याचे संचालक मंडळ सभा दि. ०३/०९/२०२४ ठराव क्र. ७ ने शिफारस केलेली आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे केली आहे. तरी आपण यांस मंजुरी द्यावी, ही विनंती.

| क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | राखीव निधी (२५%) | ३९,०२,४२०.०० |
| २. | लाभांश १०% | ७५,८३,३८२.०० |
| ३. | निवडणूक निधी | २,००,०००.०० |
| ४. | प्रशिक्षण निधी | ५,००,०००.०० |
| ५. | गुंतवणूक चढउतार निधी | ४,००,०००.०० |
| ६. | जादा एन.पी.ए. तरतूद | ३०,२३,८७७.१० |
| | एकूण – | १,५६,०९,६७९.१० |

**संचालक व सेवक प्रशिक्षण :**

संस्थेचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने व्हावे, स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलण्यासाठी व ग्राहकांना चांगली व समाधानकारक सेवा देणे याकरिता संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना व संचालकांना विविध माध्यमातून प्रशिक्षण दिले जाते.

१. अहवाल सालात सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित, कराड यांचे मार्फत आयोजित केलेल्या प्रशिक्षणात संस्थेचे सर्व कर्मचारी व संचालक यांना प्रशिक्षण देण्यात आले. २. त्याचप्रमाणे अहवाल सालात सॅपअॅक्ट प्रा.लि. यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. ३. श्री. प्रदिप बर्गे (उपनिबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे) यांचे वसुली व्यवस्थापन – कलम १०१, १५६, नियम – १०७ या विषयावर तसेच श्री. गणेश निमकर सो (सहकार सल्लागार) यांचे एन.पी.ए. व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण कर्मचारी व संचालक यांना देण्यात आले.

**वैधानिक लेखापरिक्षण :**

संस्थेचे सन २०२३–२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण मे.वैभव मोहोळकर अॅण्ड असोसिएट्स, यांनी केले असून त्यांच्या मौलिक मार्गदर्शनामुळे संस्था प्रगतिपथाकडे वाटचाल करीत आहे. संस्थेच्या एकंदर कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले आहे व भविष्यातील उत्कर्षासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सन २०२३–२०२४ अखेर संस्थेला ऑडीट वर्ग 'ब' मिळाला आहे.

संस्थेचे सन २०२३–२०२४ चे टॅक्स ऑडिट श्री.सागर वाघ सो,, सिस्टिम ऑडिट सीए. श्री. अनुपम खरात सो, जी.एस.टी.कन्सल्टंट श्री. नरेंद्र गांधी सो, टि.डी.एस.कन्सल्टन्ट श्री. प्रभाकर सोनपाटकी सो यांनी केलेले असून सर्वांचे मनःपूर्वक आभार !

**विशेष अभिनंदन :**

१. संस्थेचे संचालक श्री. अमर कोल्हापुरे यांना स्टारज् ऑफ इंडिया अॅवार्ड व सातारा न्यूज मिडिया सेवेनचा 'सातारा प्राईड पुस्कार २०२३' मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!
२. संस्थेचे संचालक श्री. अमर कोल्हापुरे व त्यांच्या पत्नी सौ. प्रीती कोल्हापुरे यांनी सातारा ते पंढरपूर वारी सायकलवर यशस्वीरित्यापूर्ण केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!
३. पॅरीस येथे झालेल्या ऑलिम्पिक व पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धेत सर्व यशस्वी खेळाडू यांचे मनःपूर्वक अभिनंदन!
४. आय.सी.सी. टी–२० मेन्स विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा विजय झालेबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!
५. राष्ट्रीय स्तरावरील खेलो इंडिया, आंतरविद्यापिठीय स्पर्धा तसेच शालेय स्पर्धेमध्ये संस्थेची सहसंस्था वाई जिमखान्याचे खेळाडू कु. अस्मिता मांढरे, कु. चैताली जगताप, कु. मधुरा सपकाळ, कु. नेहा क्षिरसागर, कु. पल्लवी शिंदे, चि. रविंद्र पाटील, कु. सई शिंदे, चि. शिवम कासार, चि. वैभव गाढवे, चि. वेदांत शिंदे व चि. वेदांत कदम यांनी मल्लखांब व रोप मल्लखांब या खेळ प्रकारात उज्वल यश संपादन केले त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!

६. मल्लखांब व रोप मल्लखांब राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत संस्थेची सहसंस्था वाई जिमखान्याचे खेळाडू कु. आकांक्षा बर्गे, कु. कृष्णाली क्षिरसागर, कु. नेहा क्षिरसागर, कु. पल्लवी शिंदे, कु. प्राप्ती ढमाळ, कु. सायली गोरे, कु. सई शिंदे, चि. शिवम कासार, चि. वैभव गाढवे चि. वेदांत शिंदे, चि. वेदांत कदम यांनी उज्वल यश संपादन केले त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!

७. राज्यस्तरावरील मल्लखांब व रोप मल्लखांब शालेय स्पर्धेत संस्थेची सहसंस्था वाई जिमखान्याचे खेळाडू कु. आकांक्षा बर्गे, कु. सायली गोरे, कु. श्रेया सपकाळ यांनी सहभाग नोंदविला.

८. गोवा येथे झालेल्या नॅशनल गेम स्पर्धेत मल्लखांब व रोप मल्लखांब या खेळ प्रकारात कु. पल्लवी शिंदे, कु. सई शिंदे, कु. नेहा क्षिरसागर यांनी सांघिक प्रथम क्रमांक पटकिवले तसेच कु. नेहा क्षिरसागर यांनी रोपमल्लखांब या खेळप्रकारात साधन विजेतेपद द्वितीय क्रमांक पटकविला त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!

**सामाजिक उपक्रम :**

सामाजिक कार्यात कायम अग्रेसर असणारी संस्था म्हणजे 'उत्कर्ष पतसंस्था' असा नावलौकीक असणाऱ्या या संस्थेमार्फत वाई तालुक्यातील सर्वात मोठा महोत्सव हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत आयोजित केला जातो, तो म्हणजे 'वाई फेस्टिवल'. या अंतर्गत शहीद जवान स्मरणार्थ सायकल रॅली, शरिरसौष्ठव, ग्रुप डान्स स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, टॅलेंट हंट स्पर्धा, पाककला स्पर्धा अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. संस्थेच्या सर्व शाखांचे ठिकाणी रक्तदान शिबिर आयोजित करणेत आले. सदर रक्तदान शिबिरामध्ये एकूण ६३९ इतके विक्रमी रक्तदान झाले. वाई तालुक्यातील कलाकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन उत्कर्ष पतसंस्था व वाई जिमखाना, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने केले जाते. या सोहळ्याचे औचित्य साधुन, क्रीडा, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या व्यक्तीस संस्थेचे संस्थापक कै.आनंद कोल्हापुरे यांच्या स्मरणार्थ 'आनंद पुरस्कार' टी.ॲण्ड टी. उद्योगसमूहाचे श्री. शिवराम थोरवे यांना प्रदान करण्यात आला. उत्कर्ष पतसंस्थेतील सर्वोत्कृष्ट काम करणारे श्री. प्रशांत प्रभाकर सोनावणे यांना 'आदर्श कर्मचारी पुरस्कार' प्रदान केला गेला. शैक्षणिक क्षेत्रात उत्तम श्रेणी प्राप्त करणाऱ्या सभासदांचे पाल्यास बक्षीस वाटप केले गेले.

कै. आनंद कोल्हापुरे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी वृक्षारोपन केले जाते. यावर्षी संस्थेच्या पाचवड शाखेच्या जवळील तिरंगा इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात तसेच मोतीबाग, वाई येथील संजय (आबा) पाटणे यांचे घराजवळील परिसरात विविध प्रकारच्या बहुउपयोगी वृक्षांचे वृक्षारोपन करण्यात आले. तसेच राजेश अभ्यासिका, पाचवड येथे स्पर्धापरिक्षांसाठी उपयुक्त असणारी पुस्तके भेट देण्यात आली. गणेशोत्सवा निमित्त वाईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस सत्यनारायण पूजा प्रसादासाठी आवश्यक साहित्य देण्यात आले. संस्थेचे संस्थापक कै.आनंद कोल्हापुरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त वाई वसंत व्याख्यानमाला, वाई येथे दरवर्षी दि.१२ मे चे व्याख्यान आपल्या संस्थेमार्फत घेण्यात येते. यावर्षी मा.श्री. समीर नेसरीकर यांचे 'आजच्या काळातील अर्थभान' या विषयावर व्याख्यान आयोजित करणेत आले होते.

**सामाजिक बांधिलकी :**

सामाजिक बांधिलकी म्हणून उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्थेचे सर्व संचालक यांना मिळणारा मिटींग भत्ता संस्थेची सहसंस्था वाई जिमखाना, वाई या संस्थेला देणगी स्वरूपात अदा करतात. वाईमधील प्राज्ञपाठ शाळेस आर्थिक सहाय्य करणेत आले.

**श्रद्धांजली :**

अहवाल सालात आपल्या संस्थेचे विशेष वसुली अधिकारी कै. हेमंत दिलीप करंजे यांचे आकस्मित निधन झाले, तसेच वाईतील प्रतिथयश डॉक्टर, लेखक, रंगकर्मी, कवी, शंतनू अभ्यंकर यांचे निधन झाले, गो-कॅशलेस इंडीयाचे संस्थापक कै. कृष्णत चन्ने सर यांचे निधन झाले, तसेच वीर जवान, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय किर्तीचे थोर नेते, समाजसुधारक, सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, कवी-साहित्यीक, विचारवंत, संस्थेचे हितचिंतक ज्यांचे निधन झाले त्या सर्वांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली. नैसर्गिक आपत्ती, अपघात, बॉंबस्फोट, महापूर यामुळे ज्ञात अज्ञात व्यक्ती दिवंगत झाल्या, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**कृतज्ञता :**

श्री. प्रदिप बर्गे (उपनिबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे), जिल्हा उपनिबंधक मा.श्री.मनोहर माळी साहेब, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था वाईचे सेवानिवृत्त सहा निबंधक मा.श्री.खामकर साहेब, तसेच विद्यमान सहा. निबंधक मा.श्री. अजित क्षिरसागर सो, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष मा.श्री.ओमप्रकाश तथा काका कोयटे साहेब, सहकार सल्लागार मा.श्री. गणेश निमकर, पदाधिकारी व अधिकारी, सहाय्यक निबंधक परसेवा अधिकारी मा.श्री. हर्षित तावरे साहेब, सातारा जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे सर्व पदाधिकारी व अधिकारी, आर.बी.आय.चे निवृत्त अधिकारी मा.श्री.अविनाश जोशी सर, मा.श्री. सुनिल गुलाबराव शिंदे, संस्थेचे प्रॉपर्टी व्हॅल्युएटर श्री. सुनिल संकपाळ, सोने व्हॅल्युएटर - श्री. बजरंग पंडित, श्री. उमेश खरोटे, श्री. अभिषेक गांधी, श्री. भरत शहा, श्री. शुभम पाटोळकर, श्री. संतोष महामुनी, श्री. श्रीपाद लोळगे, श्री. प्रकाश पालकर, श्री. विनायक पालकर, श्री. प्रविण कऱ्हाडे, श्री. नितीन बेलापूरकर, श्री. सिध्दार्थ पोतदार, सौ. सोनाली पोतदार संस्थेचे सल्लागार मा.श्री.संदीप पाटील सर, श्री.संजय देशपांडे सर, श्री. अतुल भाटे, वाईच्या मा.प्रांताधिकारी, सर्व पत्रकार बांधव, संस्थेचे सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतक, सर्व शाखांचे स्थानिक सल्लागार या सर्वांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार !

आपली
**श्रीमती. अनुराधा आनंद कोल्हापुरे**
अध्यक्षा

# एकत्रित ताळेबंद पत्रक 'एन' नमुना

| अ. क्र. | भांडवल व देणी | ३१ मार्च २०२४ | ३१ मार्च २०२३ |
|---|---|---|---|
| १. | भागभांडवल | | |
| | अ. अधिकृत भागभांडवल | ८,००,००,०००.०० | ८,००,००,०००.०० |
| | ब. वसूल भागभांडवल | ७,८०,८४,९००.०० | ७,२८,६९,७००.०० |
| २. | गंगाजळी व इतर निधी | २१,७३,४६,७४७.०३ | २०,०८,६९,२०१.९३ |
| ३. | तारणी कर्जे व ओ.डी. | २१,८८,३७२.४२ | १,५४,४४,२९७.०० |
| ४. | ठेवी | १,०५,९१,६२,९५६.०३ | १,०३,६५,३१,४८१.८७ |
| ५. | चालू देणी व तरतुदी | | |
| | अ. एन.पी.ए. खाते थकव्याज | २,८६,१०,३५६.०० | ५,४१,७७,५३७.०० |
| ६. | देय लाभांश | ११,४०,८७३.०० | १४,०७,९०२.०० |
| ७. | व्याज देणे | ५,४६,९१,०८५.०० | ४,१६,१९,७७९.०० |
| ८. | इतर देणी | ७,१८,५८,७९७.७५ | २,९३,०८,६२४.५० |
| ९. | नफा तोटा खाते | | |
| | अ.चालू वर्षाचा नफा | १,५६,०९,६७९.१० | २,२१,६३,७९८.१० |
| | एकूण | १,५२,८६,९३,७६६.३३ | १,४७,४३,९२,३२१.४० |

लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

मे. वैभव मोहोळकर ॲण्ड असोसिएटस्
वैधानिक लेखापरिक्षक - CA

श्रीमती अनुराधा आनंद कोल्हापुरे
चेअरमन

ॲड.श्री. रमेश रामचंद्र यादव
व्हा.चेअरमन

श्री. प्रकाश मारूती पवार
मुख्य व्यवस्थापक

## दि.३१ मार्च २०२४ अखेर

| अ. क्र. | मालमत्ता व येणी | ३१ मार्च २०२४ | | ३१ मार्च २०२३ |
|---|---|---|---|---|
| १. | **रोख व इतर बँकातील शिल्लक** | | १,२२,४३,७४४.८७ | १,३९,८६,०४१.४९ |
| | अ.रोख शिल्लक | ४५,५५,३७४.०० | | |
| | ब.इतर बँकातील शिल्लक | ७६,८८,३७०.८७ | | |
| २. | **गंतवणुक** | | ४०,५९,२३,७८८.७८ | ५०,०७,९५,४८७.७८ |
| | अ.गुंतवणुक | २४,१६,८६,८५९.०० | | |
| | ब.निधी गुंतवणूक | १६,२४,५७,८२९.७८ | | |
| | क.शेअर्समधील गुतवणूक | १७,७९,१००.०० | | |
| ३. | **कर्जे व अग्रीम रक्कमा** | | ९६,१९,०३,२८५.४५ | ८२,५२,३४,६५२.४५ |
| | अ. तारणी कर्जे | ७६,१५,४४,२१९.९५ | | |
| | ब.विनातारणी कर्जे | १४,३५,३२,०७७.५० | | |
| | क.ठेव तारण कर्जे | ५,२८,३५,४२६.०० | | |
| | ड.संचालक मंडळास दिलेली कर्जे | ३९,९१,५६२.०० | | |
| ४. | **मालमत्ता** | | ९७,९८,७९९.१० | ९८,४३,८३९.१० |
| ५. | **स्थावर मालमत्ता इमारत** | | २,७३,३९,६९३.०० | २,७३,३९,६९३.०० |
| ६. | **इतर येणी** | | १,०२,१७,७९८.७८ | ७५,८४,८६४.९५ |
| | अ.इतर येणी (डिपॉझिट) | २७,४६,५१६.०० | | |
| | ब.इतर येणी (किरकोळ) | ७४,७१,२८२.७८ | | |
| ७. | **येणे व्याज** | | १०,१२,६६,६५६.३५ | ८,९६,०७,७४२.६३ |
| | अ.कर्जावरील (एन.पी.ए.) | ६,६५,७०,९७२.७५ | | |
| | ब.गुंतवणुकीवरिल | ३,४६,९५,६८३.६० | | |
| ८. | **नफा -तोटा खाते** | | | |
| | **एकूण** | १,५२,८६,९३,७६६.३३ | | १,४७,४३,९२,३२१.४० |


▪ संचालक मंडळ ▪

श्री. अमर आनंद कोल्हापुरे
श्री. मदन कृष्णाजी साळवेकर
डॉ.श्रीमती मंगला प्रकाश अहिवळे
श्री. श्रीकांत सुनिल शिंदे
श्री. शरद रामचंद्र चव्हाण
श्रीमती नीला मधुकर कुलकर्णी
श्री. सलीमभाई सोनुभाई बागवान
श्री. संजय लक्ष्मण वाईकर
श्री. सागर विलास मुळे
श्री. वैभव सुरेश फुले
श्री. भूषण सुधाकर तारू
श्रीमती अलका मदन घाडगे

# एकत्रित नफा-तोटा पत्रक 'एन' नमुना

| अ. क्र. | खर्च | | ३१ मार्च २०२४ | ३१ मार्च २०२३ |
|---|---|---|---|---|
| १. | ठेवीवरील व्याज | | ८,१८,९६,५४५.०० | ६,८९,८६,७७२.०० |
| | अ. ठेवीवरील | ७,९३,९४,४२४.०० | | |
| | ब. बँक कर्जावरील | २५,०२,१२१.०० | | |
| २. | सेवक वेतन, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | | २,०३,८९,६८७.०० | १,४३,४२,८०८.०० |
| ३. | एजंट कमिशन | | १८,७२,५०५.०० | १२,६३,९२८.०० |
| ४. | जाहिरात, स्टेशनरी, झेरोक्स चेकबुक चार्जेस | | १६,३७,५१७.३६ | ९,३७,९८५.०३ |
| ५. | सादिल खर्च | | ३,८३,४२०.०० | १,६३,३७१.५० |
| ६. | वीज बील ,टेलिफोन बील | | ७,३६,७५५.०० | ५,१६,१९९.०० |
| ७. | एन.पी.ए तरतूद | | ६८,१५,७२४.०० | ४८,१८,७२३.७० |
| ८. | घसारा | | ४६,८८,५७४.०० | ३९,००,२९९.८५ |
| ९. | संस्था विमा, भाडे, कर, जी.एस.टी. | | ३५,८७,४५८.२९ | १३,४८,९१९.०८ |
| १०. | ऑडीट फी | | ६,५८,१४०.०० | ६,९४,८३०.०० |
| ११. | मासिक मिटींग भत्ता | | ५६,८००.०० | ५५,०००.०० |
| १२. | देणगी | | १,०००.०० | ५७,००१.०० |
| १३. | अहवाल छपाई | | ७८,४००.०० | ३४,०००.०० |
| १४. | वार्षिक सभा | | १,३५,३४०.०० | ५४,७३८.०० |
| १५. | कार्यालयीन खर्च | | ५,९२,६२३.०० | २,५८,०८९.०० |
| १६. | बोनस | | १०,४४,५३३.०० | ८,९८,०८७.०० |
| १७. | कॅलेंडर छपाई | | १,९५,०००.०० | १,१४,८००.०० |
| १८. | प्रशिक्षण /गणवेश, सल्लागार फी | | ४,४८,९३८.०० | ६,७६,७९९.०० |
| १९. | दुरुस्ती व देखभाल खर्च | | २,०७,३३६.०० | २,४२,७१२.०० |
| २०. | संगणक व सॉफ्टवेअर | | ५,००,७३३.०० | ४,४७,०२०.०० |
| २१. | न्यायालयीन व स्टॅम्प खर्च | | २,८५,३६०.०० | ८७,४००.०० |
| २२. | रिबेट | | ०.०० | ३,११,२२९.०० |
| २३. | निवडणूक खर्च | | १०,००,०००.०० | ८०,०००.०० |
| २४. | हर घर तिरंगा कार्यक्रम खर्च | | ०.०० | १,९५,४१६.०० |
| २५. | शाखा उद्घाटन खर्च | | ३,२२९.०० | १,०९,०७१.०० |
| २६. | नफा (ताळेबंदाकडे वर्ग) | | १,५६,०९,६७९.१० | २,२१,६३,७९८.१० |
| | एकूण : | | १४,२८,२५,२९६.७५ | १२,२७,५८,९९६.२६ |

लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

मे. वैभव मोहोळकर अ‍ॅण्ड असोसिएटस्
वैधानिक लेखापरिक्षक - CA

| श्रीमती अनुराधा आनंद कोल्हापुरे | अ‍ॅड.श्री. रमेश रामचंद्र यादव | श्री. प्रकाश मारूती पवार |
|---|---|---|
| चेअरमन | व्हा.चेअरमन | मुख्य व्यवस्थापक |

# दि.३१ मार्च २०२४ अखेर

| अ. क्र. | उत्पन्न | | ३१ मार्च २०२४ | ३१ मार्च २०२३ |
|---|---|---|---|---|
| १. | **मिळालेले व्याज** | | १३,८२,९०,१७१.२२ | ११,६७,०९,०८०.६५ |
| | अ. गुंतवणूकीवरील | ३,०५,८१,८६४.९७ | | |
| | ब. बॅंक खात्यावरील | ६५,६९४.०० | | |
| | क. कर्जावरील | १०,७४,७०,६०७.२५ | | |
| | ड. टी.डी.एस. | १,७२,००५.०० | | |
| २. | **कमिशन** | | २,४८,६३४.२८ | ३,१२,००७.६१ |
| ३. | **फॉर्म फी, लाभांश, प्रोसेसिंग फी** | | ४२,८६,४९१.२५ | ५७,३७,९०८.०० |
| | एकूण : | | १४,२८,२५,२९६.७५ | १२,२७,५८,९९६.२६ |

संचालक मंडळ

श्री. अमर आनंद कोल्हापुरे
श्री. मदन कृष्णाजी साळवेकर
डॉ.श्रीमती मंगला प्रकाश अहिवळे
श्री. श्रीकांत सुनिल शिंदे
श्री. शरद रामचंद्र चव्हाण
श्रीमती नीला मधुकर कुलकर्णी
श्री. सलीमभाई सोनुभाई बागवान
श्री. संजय लक्ष्मण वाईकर
श्री. सागर विलास मुळे
श्री. वैभव सुरेश फुले
श्री. भूषण सुधाकर तारू
श्रीमती अलका मदन घाडगे

# सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक

| उत्पन्न तपशील | ३१.०३.२०२४ अंदाजे उत्पन्न | ३१.०३.२०२४ प्रत्यक्ष उत्पन्न | ३१.०३.२०२४ कमी/जास्त उत्पन्न | ३१.०३.२०२५ अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| कर्जावरिल व्याज | १२,६०,५०,०००.०० | १०,७४,७०,६०७.३० | -१,८५,७९,३९२.७० | १२,००,००,०००.०० |
| गुंतवणुकीवरिल व्याज | ३,२१,४६,०००.०० | ३,०५,८१,८६४.९७ | -१५,६४,१३५.०३ | ४,००,००,०००.०० |
| लाभांश | २,०४,०००.०० | २,०४,०००.०० | ०.०० | २,०४,०००.०० |
| इतर उत्पन्न | ६५,००,०००.०० | ४५,६८,८२४.५३ | -१९,३१,१७५.४७ | ६५,००,०००.०० |
| एकुण | १६,४९,००,०००.०० | १४,२८,२५,२९६.८० | -२,२०,७४,७०३.२० | १६,६७,०४,०००.०० |

| खर्च तपशील | ३१.०३.२०२४ अंदाजे खर्च | ३१.०३.२०२४ प्रत्यक्ष खर्च | ३१.०३.२०२४ कमी/जास्त खर्च | ३१.०३.२०२५ अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | ८,२८,००,०००.०० | ८,१८,९६,५४५.०० | -९,०३,४५५.०० | ९,५५,००,०००.०० |
| सेवक वेतन, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, बोनस | १,६४,००,०००.०० | २,१४,३४,२२०.०० | ५०,३४,२२०.०० | २,३०,००,०००.०० |
| एजंट कमिशन | १५,००,०००.०० | १८,७२,५०५.०० | ३,७२,५०५.०० | २०,००,०००.०० |
| जाहीरात, स्टेशनरी, झेरॉक्स | १२,५०,०००.०० | १६,३७,५१७.३६ | ३,८७,५१७.३६ | १८,४४,०००.०० |
| वीज बील, टेलिफोन बील, पोस्टेज | ५,५०,०००.०० | ७,३६,७५५.०० | १,८६,७५५.०० | ८,००,०००.०० |
| एन.पी.ए. व ज्यादा एन.पी.ए. तरतुद | ०.०० | ६८,१५,७२४.०० | ६८,१५,७२४.०० | ०.०० |
| घसारा | ४५,००,०००.०० | ४६,८८,५७४.०० | १,८८,५७४.०० | ५०,००,०००.०० |
| संस्था विमा, भाडे, कर, जी.एस.टी. | २५,००,०००.०० | ३५,८७,४५८.२९ | १०,८७,४५८.२९ | ३७,००,०००.०० |
| ऑडीट फी | ७,००,०००.०० | ६,५८,१४०.०० | -४१,८६०.०० | १०,००,०००.०० |
| अहवाल व कॅलेंडर छपाई | २,००,०००.०० | २,७३,४००.०० | ७३,४००.०० | ३,००,०००.०० |
| वार्षिक सभा, समारंभ खर्च, मिटींग खर्च | ५,००,०००.०० | ३,६०,८२४.०० | -१,३९,१७६.०० | ५,००,०००.०० |
| कार्यालयीन खर्च/उद्घाटन खर्च साफसफाई खर्च/सादील खर्च | ६,००,०००.०० | ७,५३,७८८.०० | १,५३,७८८.०० | ९,००,०००.०० |
| प्रशिक्षण/गणवेश/सल्लागार फी | ८,००,०००.०० | ४,४८,९३८.०० | -३,५१,०६२.०० | ५,००,०००.०० |
| दुरूस्ती व देखभाल खर्च | १३,५०,०००.०० | ७,०८,०६९.०० | -६,४१,९३१.०० | १०,००,०००.०० |
| संगणक व सॉफ्टवेअर, रिबेट | ५,००,०००.०० | ०.०० | -५,००,०००.०० | ०.०० |
| मासिक मिटींग भत्ता | ५५,०००.०० | ५६,८००.०० | १,८००.०० | ६०,०००.०० |
| देणगी व वर्गणी | १,००,०००.०० | १,०००.०० | -९९,०००.०० | १,००,०००.०० |
| न्यायालयीन खर्च, स्टॅम्प कॉस्ट | २,००,०००.०० | २,८५,३६०.०० | ८५,३६०.०० | ५,००,०००.०० |
| निवडणूक खर्च | ०.०० | १०,००,०००.०० | १०,००,०००.०० | ०.०० |
| नफा | ५,०३,९५,०००.०० | १,५६,०९,६७९.१० | -३,४७,८५,३२०.९० | ३,००,००,०००.०० |
| एकूण | १६,४९,००,०००.०० | १४,२८,२५,२९६.७५ | -२,२०,७४,७०३.२५ | १६,६७,०४,०००.०० |

लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

मे. वैभव मोहोळकर ॲण्ड असोसिएटस्
वैधानिक लेखापरिक्षक - CA

श्रीमती अनुराधा आनंद कोल्हापुरे
चेअरमन

